





Kolhapur, Maharashtra, India
Rajarshi Chh.Shahu College,Kadamwadi Road, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416005, India
Lat 16.712419°
Long 74.251862°
27/05/22 10:56 AM
Google


Kolhapur, Maharashtra, India
Rajarshi Chh.Shahu College,Kadamwadi Road, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416005, India
Lat 16.712419°
Long 74.251862°
27/05/22 11:24 AM
Google


Kolhapur, Maharashtra, India
Rajarshi Chh.Shahu College,Kadamwadi Road, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra
416005, India
Lat 16.712419°
Long 74.251862°
27/05/22 11:01 AM
Google

KOLHAPUR


EPSON




RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLL... KOLHAPUR




RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLE... KOLHAPUR

**रयत शिक्षण संस्थेचे,**

## राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

# वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ अहवाल

दिनांक : २७/०५/२०२२

रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक समारंभ संपन्न झाला. महाविद्यालयातील गुणवंत व यशवंत विद्यार्थी, प्राध्यापकांचा गौरव या समारंभामध्ये करण्यात आला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षक व राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेते मा. राम सारंग हे होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना मा.सारंग सर म्हणाले की, "महाविद्यालयीन कालखंडातच विद्यार्थ्यांना खेळाचे योग्य मार्गदर्शन मिळत असते. माझ्या खेळाच्या यशस्वी वाटचालीमध्ये शाहू कॉलेजचे योगदान महत्त्वाचे आहे. खेळामध्ये एकाग्रता महत्त्वाची असते. एकाग्रतेमुळे आपण यशाला गवसणी घालू शकतो. शासनाने ही खेळाडूंकडे विशेष लक्ष द्यावे." असे विचार व्यक्त करून त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून खेळाचे महत्त्व पटवून देले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रो.डॉ.व्ही.व्ही.किल्लेदार होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ.किल्लेदार म्हणाले की, "गुणवंत विद्यार्थी हे महाविद्यालयाचे प्रेरणास्थान असतात. कॉलेजमध्ये अभ्यासाबरोबरच खेळामध्येही विद्यार्थ्यांनी कामगिरी करावी. महाविद्यालयाचे विद्यार्थी माऊली जमदाडे व सुबिया मुलाणी हे खेळामध्ये उत्कृष्ट कामगिरी करीत आहेत. याचा महाविद्यालयाला अभिमान आहे. तसेच शिक्षकांनीही विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी जागृकता निर्माण करावी." असे मत व्यक्त केले. ." असे मत व्यक्त केले. यावेळी मा.श्रीमती सरोज(माई) पाटील जनरल बॉडी सदस्य, रयत शिक्षण संस्था सातारा. यांनी ही आपल्या मनोगतातून खेळाडूंचे कौतुक केले. सतत देशासाठी खेळत राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमासाठी रयत शिक्षण संस्था जनरल बॉडीचे सदस्य मा.विक्रांत पाटील, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा.सत्यजित कदम, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.के.व्ही.गायकवाड आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते क्रीडा, शैक्षणिक क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेले विद्यार्थी तसेच उल्लेखनीय कामगिरी करणारे प्राध्यापक व आदर्श विद्यार्थी–विद्यार्थिनी आदर्श प्राध्यपक आणि आदर्श शिक्षकेतर सेवक यांचा गौरव महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला. यावेळी जिमखाना विभागाचा अहवाल व सत्कार वाचन शारीरिक शिक्षण संचालक डॉ.विक्रमसिंह नांगरे यांनी केले. गुणवंत विद्यार्थी सत्कार वाचन वाणिज्य विभागप्रमुख डॉ.एस.एस.लवेकर यांनी केले तर पत्रकार व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सेवकांचे सत्कार वाचन डॉ.बी.बी.घुरके यांनी केले. आदर्श विद्यार्थी, प्राध्यपक यांच्या सत्काराचे वाचन प्रा.विनोद आखाडे यांनी केले. या पारितोषिक वितरण समारंभातून क्रीडा क्षेत्रातील कामगिरीसाठी एकूण ३७, विशेष उल्लेखनीय कामगिरी करणारे एकूण ३७, वर्गामधून विशेष प्रविण्य मिळविलेले एकूण २१ तर आदर्श विद्यार्थी सेवक एकूण ०६ अशी पारितोषिके प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक व मान्यवरांचा परिचय वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे चेअरमन प्रा.एस.ए.शिंदे यांनी केले. आभार शारीरिक शिक्षण विभागप्रमुख प्रा.जी.एम.लवंगारे यांनी व्यक्त केले तर सूत्रसंचालन श्रीमती ज्योती कांबळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालायचे प्र.प्राचार्य प्रो.डॉ.व्ही.व्ही.किल्लेदार यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.

समन्वयक
वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR

प्राचार्य
I/C PRINCIPAL
R.C. SHAHU COLLEGE
KOLHAPUR